# अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने तथा अन्य वन प्रकल्पामुळे बाधित होणा-या कुटुंबाचे पुनर्वसना बाबत धोरण.

**महाराष्ट्र शासन**
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रं.डब्ल्यूएलपी-१०१२/प्र.क्र.१२२/फ-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनाक:- ३ नोव्हेबर, २०१२

वाचा:-१) शासन निर्णय क्रं .डब्ल्यूएलपी-१०९९/प्र.क्र.१११/फ-१, मंत्रालय, मुंबई-४०००३२, दि. १७ जुलै, २००० // P.NO. 15
२) शासन समक्रमांक दि.२८ जुलै, २००० चे शुध्दीपत्रक // उपलब्ध नाही.
३) शासन निर्णय क्रं. डब्ल्यूएलपी-२००७/प्र.क्र.१६/फ- १ मंत्रालय मुंबई -३२, दि. २३ /०१/ २००७. // P.NO. 19
४) शासन निर्णय क्र.संकीर्ण २०११/प्र.क्र.८०/र-८ दिनांक २४ मे,२०१२ // P.NO. 22
५) शासन निर्णय क्र. संकीर्ण २०११ /प्र.क्र.९२/र-८ दिनांक २१ /०८/२०१२ // उपलब्ध नाही.

**(१) प्रस्तावना:-**

महाराष्ट्र राज्यात वन्य प्राणी संरक्षणाच्या दृष्टीने वन्य प्राणी (संरक्षण) अधिनियम १९७२ च्या तरतूदीनुसार ६ राष्ट्रीय उद्याने व ४१ अभयारण्ये व १ संवर्धन राखीव क्षेत्र अधिसूचित आहेत. त्यापैकी ४ राष्ट्रीय उद्यानाचे क्षेत्र व ६ अभयारण्याचे क्षेत्र राज्यातील मेळघाट, पेंच, ताडोबा-अंधारी व सहयाद्री व्याघ्र प्रकल्पांतर्गत येते. संरक्षित क्षेत्रात असलेल्या वस्तीमध्ये अस्तित्वात असलेल्या सोयीसवलती व पायाभूत सुविधांमध्ये उदा. कच्च्या रस्त्याचे डांबरीकरण करणे, विद्युत पुरवठयासाठी नविन लाईन, शाळा, महाविद्यालय इत्यादी विकासाची कामे करणे अथवा त्यामध्ये वाढ करणे आवश्यक आहे. तथापि सदर विकासात्मक कामे वन्य प्राणी संरक्षण कायदा, १९७२ व त्याअनुषंगाने सर्वोच्च न्यायालयाच्या विविध निर्णयांमुळे करणे शक्य होत नाही. त्याचप्रमाणे वन्य प्राण्यांसाठी सुरक्षित क्षेत्र निर्मित करण्याकरिता व वन्य प्राणी-मानव संघर्ष कमी करण्याच्या दृष्टीने संरक्षित क्षेत्रातील मानवी वस्तींना अभयारण्य/राष्ट्रीय उद्यान बाहेर पुनर्वसीत करणे आवश्यक आहे. संरक्षित क्षेत्रातील गावांचा विकास व वन्यजीव संवर्धनाचा सुवर्णमध्य गाठण्यासाठी संरक्षित क्षेत्रातील गावांचे पुर्नवसन आवश्यक आहे.

व्याघ्र प्रकल्पातील ज्या गावांचे पुर्नवसन करावयाचे आहे त्या गावांच्या पुर्नवसनाकरीता केंद्र शासनाने सन २०११ मध्ये जाहीर केलेली सुधारीत मार्गदर्शक तत्वे राज्यातील फक्त व्याघ्र प्रकल्प क्षेत्रातील गावांच्या पुर्नवसनाकरीताच लागू आहेत. महाराष्ट्र राज्यातील राष्ट्रीय उद्याने व अभयारण्याच्या बाबतीत शासन निर्णय क्र.डब्ल्यूएलपी १०९९/प्र.क्र.८१/फ-१ दिनांक १७.७.२००० अन्वये संरक्षित क्षेत्रातील गावांच्या पुनर्वसनाबाबतचे मूळ धोरण निश्चित केलेले आहे व त्यानंतर वन विभागाकडून मूळ धोरणामध्ये वेळोवेळी अनुषंगिक सुधारणा केलेल्या आहेत. व्याघ्र प्रकल्प, व्याघ्र संरक्षणाच्या दृष्टीने राष्ट्रीय महत्वाचे प्रकल्प असून त्यांच्या पुनर्वसनाकरिता केंद्रशासनाकडून निधी प्राप्त होत असतो. तथापि एकंदरीत पुनर्वसनाच्या दृष्टीने व्याघ्र प्रकल्पासाठी केंद्रशासनाचे व राज्यातील इतर संरक्षित क्षेत्रांच्या बाबतीत राज्य शासनाचे सध्याचे धोरण यात काहीशी तफावत असून याबाबतीत दोन्ही ठिकाणी परिस्थिती सारखीच असल्यामुळे त्यात एकसूत्रता असणे आवश्यक आहे.

सध्याचे वन विभागाचे पुनर्वसन धोरण हे महाराष्ट्र प्रकल्पग्रस्त व्यक्तिचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ मधील तरतुदीला अनुसरुन आहे. हया अधिनियमात प्रकल्पाच्या परिभाषेत वन्य प्राणी अभयारण्याचाही समावेश आहे. महाराष्ट्र प्रकल्पग्रस्त व्यक्तिचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ मध्ये पुनर्वसन लाभक्षेत्रात करण्याबाबत तरतूद आहे. तथापि अभयारण्याच्या बाबतीत सिंचन प्रकल्पासारखे लाभक्षेत्र नसल्यामुळे पुनर्वसनाकरिता पर्यायी जागा मिळणे फार अवघड ठरत असल्याने पुनर्वसन प्रक्रिया कठीण होत आहे.

सद्य:स्थितीत संरक्षित क्षेत्रातील गावांच्या बाबतीत दिनांक १७ जुलै, २००० व दिनांक २३ जुलै, २००७ चे शासन निर्णयानुसार पुनर्वसनाची कार्यवाही चालू आहे. तसेच केंद्रशासनाने २००८ मध्ये व्याघ्र प्रकल्पातील ज्या गावांचे पुनर्वसन करावयाचे आहे, त्या गावांच्या पुनर्वसनाकरिता मार्गदर्शक तत्वे निर्गमित केली आहेत व त्यानंतर सन २०११ मध्ये पुनर्वसन धोरण जाहीर करण्यात आले आहे. या सर्व बाबींचा विचार करता व्याघ्र प्रकल्पा व्यतिरिक्त इतर अभयारण्य/राष्ट्रीय उद्यानाच्या क्षेत्रातील गावांच्या पुनर्वसनाकरिता केंद्र शासनाच्या धोरणाप्रमाणे सुधारित धोरण लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :-</u>**

वरील विवेचनाच्या अनुषंगाने, वनविभागाचे पुनर्वसनासंबधीचे सध्याचे दिनांक १७ जुलै, २००० व दिनांक २३ जुलै,२००७ चे शासन निर्णय अधिक्रमीत करुन, संरक्षित क्षेत्रामध्ये उदाहरणार्थ अभयारण्य / व्याघ्र प्रकल्प / राष्ट्रीय उद्यान मध्ये पुनर्वसनाच्या बाबतीत मंत्रिमंडळाच्या दिनांक ९ ऑक्टोबर, २०१२ च्या बैठकीत झालेल्या निर्णयाप्रमाणे खालील पर्याय लागू करण्यास खालील प्रमाणे शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहेत :-

**<u>पर्याय :- १</u>**

**<u>ग्रामसभेच्या ठरावानुसार ऐच्छिक पुनर्वसनासाठी तयार असलेल्या गावांच्या बाबतीत.</u>**

महाराष्ट्र प्रकल्पग्रस्त व्यक्तिचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ च्या कलम ११ नुसार प्रकल्पामुळे बाधित होणा-या गांवाचे पुनर्वसनाचे बाबतीमध्ये विभागीय महसुल आयुक्तांनी बाधित होणा-या क्षेत्राच्या बाबतीत अधिसूचना जाहीर करावयाचे प्रावधान आहे. सदर अधिसूचना जाहीर झाल्यानंतर कलम १३ अन्वये याबाबतीत अंतिम सुचना जाहीर करण्याचे प्रावधान आहे. तथापि व्याघ्र प्रकल्प / राष्ट्रीय उद्यान / अभयारण्यातील चौकशी अधिका-यांच्या अहवालानुसार ज्या गावांचे पुनर्वसन करणे आवश्यक आहे व अशा गावांच्या ग्रामसभेने ऐच्छिक पुनर्वसन करण्याकरिता ठराव संमत केल्यास सदर गावातील जे कुटुंब स्वखुशीने केंद्रशासनाच्या व्याघ्र प्रकल्पातील गावांच्या पुनर्वसनाकरीता असलेल्या मार्गदर्शक तत्वातील विकल्प १ च्या धरतीवर प्रति कुटुंब रुपये १०.०० लाख रोख घेवून स्वत: पुनर्वसित होऊ इच्छित असतील, अशा कुटुंबाचे पुनर्वसन या विकल्पानुसार, ते स्वखुशीने असा पर्याय स्वीकारत आहेत, असे बंधपत्र घेवून त्यांचे पुनर्वसन करण्यात यावे. वरील प्रमाणे रु.१०.०० लाख रोख रक्कम पुनर्वसनाच्या ऐवज मध्ये ऐच्छिकरित्या स्विकारल्या नंतर महाराष्ट्र प्रकल्पग्रस्त व्यक्तिचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ च्या कलम ११ अंतर्गत अधिसूचना जाहीर झाल्यानंतरचे पुनर्वसन प्रक्रिये संबंधी कलम १३ ते कलम १९ अंतर्गत कारवाई अपेक्षित राहणार नाही.

पर्याय :- २

ज्या पुनर्वसीत होणा-या कुटुंबाना स्वखुषीने पुनर्वसन प्रक्रियेचा अवलंब करुन पुनर्वसित होण्याची इच्छा व्यक्त केली असल्यास, अशा कुटुंबाना पुनर्वसन सध्या अस्तित्वात असलेल्या महाराष्ट्र प्रकल्पग्रस्त व्यक्तिचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ च्या तरतूदीप्रमाणे पुनर्वसीत होण्याचा पर्याय उपलब्ध असेल.

**वरील दोनही पर्याय ऐच्छिक स्वरुपाचे असून, यापैकी कोणताही एक पर्याय प्रकल्पग्रस्त कुटुंबाला स्वखुशीने निवडता येईल.**

पूनर्वसीत होणा-या आदिवासी कुटुंबाना शक्यतो वनक्षेत्रास लागून असलेल्या व त्यांच्या सांस्कृतिक व पारंपारिक हक्क व परंपरा अबाधित ठेवून त्याच आदिवासी समाजाच्या किंवा त्याच्या सांस्कृतिक साम्य असलेल्या आदिवासी क्षेत्रात पुनर्वसन करण्यात यावे.

**पर्याय १: - पुनर्वसन करणेकरिता, महाराष्ट्र पुनर्वसन कायदा अधिसूचना संबधी मार्गदर्शक तत्वे.**

१ पुनर्वसीत होणा-या कुटुंब व प्रकल्प अधिकारी यांच्या मध्ये स्थलांतर ऐच्छिक असून ती स्विकार्य असण्याची व पुनर्वसन पॅकेजच्या मोबदल्यात रोख रक्कम रु.१०.०० लाख स्वखुशीने स्विकारत असल्यासंबधी करारनामा करण्यात यावा.

२ संरक्षित क्षेत्र म्हणजेच अभयारण्य, राष्ट्रीय उद्यान इत्यादीतून स्थलांतरीत होणा-या गावांचे पुनर्वसन करण्यापूर्वी आदिवासी आणि पारंपारीक वन निवासी (हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ अंतर्गत सर्व हक्कांबाबत विहित नियम व प्रणाली नुसार अंतिमतः निर्णय (Settlement) झालेला असावयास पाहिजे. ही बाब ऐच्छिक पुनर्वसनाकरिता देखील लागू राहील. स्वेच्छेने पुनर्वसीत होणा-या आदिवासी बांधवाचे पुनर्वसन शक्यतो वनक्षेत्राजवळील व सांस्कृतिक साम्य असलेल्या ठिकाणी करण्यात यावे ज्यामुळे त्यांचे सांस्कृतिक व पारंपारिक हक्क अबाधित राहतील.

३ कुटुंब म्हणजे व्यक्ती, नवरा-बायको (spouse), त्याचा/तिचा अज्ञान (minor), मुलगा/मुलगी, अज्ञान भाऊ, अविवाहित बहिण, आई-वडील, त्या व्यक्तिवर उदरनिर्वाह व उपजीविकेसाठी अवलंबून असलेले आणि सोबत वास्तव्य करीत असलेले इतर नातेवाईक, १८ वर्षावरील सज्ञान मुलगा/१८ वर्षावरील सज्ञान अविवाहित मुलगी एक स्वंतत्र कुटुंब समजण्यात येईल. महाराष्ट्र प्रकल्पग्रस्त व्यक्तिचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ च्या कलम ११ अन्वये ज्या तारखेला अधिसुचना जाहिर करण्यात येईल त्या दिवशी अस्तित्वात असलेले कुटुंबाची संख्या ही अंतिम समजण्यात येईल.

४ प्रकल्प बाधितांना त्यांची नुकसान भरपाई देण्या अगोदर प्रथम पती, पत्नी यांचे नांवाचे एकत्रीत (Joint account) राष्ट्रीयीकृत बँकेत बचत खाते उघडण्यात यावे. तसेच त्या बँके चे पासबुक देखील त्याला हस्तांतरण करावे. प्रकल्पबाधितांना त्यांची नुकसान भरपाई देणे व त्याचा विनियोग कशा पध्दतीने करतात या कामी जिल्हा परिषदांना किंवा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांना सहभागी करुन घेवून त्यावर सनियंत्रण ठेवण्यात यावे.

५ प्रकल्प बाधितांना त्यांच्या एकूण पुरक गरजांच्या विकासाकरिता त्यांच्या बचत खात्यात जमा करण्यात आलेल्या नुकसान भरपाई रकमेवर दरमहा ठराविक तारखेपर्यंत व्याजाची रक्कम बरोबर मिळत आहे की नाही याची दक्षता घेण्यात यावी.

६ प्रकल्प बाधित, जर शेतजमीन खरेदी करत असेल, राहण्यासाठी घर बांधत असेल वगैरे इ. स्थायी संपत्ती उभारण्यासाठी आवश्यक निधी प्रकल्प बाधितांस त्याचे बचत खात्यात जमा करण्यात आलेल्या रकमेतून रक्कम काढणेस प्रथम प्राधान्य अथवा मुभा देण्यात यावी. याबाबतीत निर्णय संबधित सहाय्यक वनसंरक्षक व उपविभागीय महसूल अधिकारी यांच्याकडून संयुक्तरित्या घेण्यात येईल. प्रकल्प बाधितास देण्यात आलेल्या रकमेतून, शेतजमीन / घरबांधणी विक्रेत्यास दयावयाची रक्कम ही राष्ट्रीय बँकेचा धनाकर्षाद्वारे देय (Demand draft) असावी, व हया बाबीचा उल्लेख प्रकल्पबाधितांचे करारनाम्याच्या अटीशर्तीमध्ये स्पष्ट उल्लेख असावा.

७ वन विभागाचे क्षेत्र संचालकाने/प्रशासकाने प्रत्येक प्रकल्प बाधिताचे स्वतंत्र दस्तऐवज अद्यावत ठेवावे व त्याबाबतची माहिती व्याघ्र प्रकल्प/ अभयारण्य/ संरक्षित क्षेत्र तथा जिल्हा समन्वयक यांना पुरविणे आवश्यक आहे.

८ जिल्हाधिकारी यांनी प्रकल्प बाधितास, तो या योजनेचा प्रकल्पग्रस्त/प्रकल्प बाधित असल्या बाबतचे प्रमाणपत्र देण्यात यावे व शासकीय नोकरीत सामावून घेण्यासाठी कायदयाच्या तरतुदीप्रमाणे (५%) प्रकल्पग्रस्तांसाठी आरक्षणाचा लाभ प्राधान्याने उपलब्ध करुन देण्यात यावा.

९ जिल्हास्तरीय विविध योजना राबविणे तसेच त्याचेवर सनियंत्रण प्रकल्प बाधित गावांतील ग्रामपंचायत व ग्रामसभेद्वारे ठेवण्यात यावे.

१० व्याघ्र प्रकल्प/अभयारण्य/राष्ट्रीय उद्यानाकरिता स्थलांतरीत होणा-या गावांचे अथवा प्रकल्प बाधित व्यक्तिच्या मालमत्तेचे मुल्यांकन जिल्हाधिकारी हे महाराष्ट्र प्रकल्पग्रस्त व्यक्तिंचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ चे कलम ११ अंतर्गत निर्गमित अधिसूचनेच्या तारखेला लागू महानोंदणी निरिक्षक यांचे शिघ्र सिध्द गणक दर प्रमाणे मुल्यांकन करतील व त्याचेवर अतिरिक्त दिलासा रक्कम (३०%) दराप्रमाणे किंमत निश्चित करतील.

११ पुनर्वसीतांना त्याचे पुनर्वसनाचा विकल्प अथवा पर्याय निवडण्यासाठी, त्यांना आवश्यक असणारी माहिती मोफत व लेखी स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात यावी.

१२ पुनर्वसीत होणा-या भूमीहीन कुटुंबासाठी दोन बँक खाती उघडण्यात यावीत, ज्या पैकी एका खात्यात रु. १.०० लक्ष व दुस-या जिल्हाधिकारी सोबत उघडलेल्या संयुक्त खात्यात रु. ९.०० लक्ष जमा करण्यात यावे. वरील नमूद रु. ९.०० लक्ष रुपये पैकी, रु. ५.०० लक्ष रुपये Annuity म्हणून गुंतवण्यात यावी. अभयारण्य / राष्ट्रीय उद्यानातील गावांना पुनर्वसीत करुन मानव वस्ती विरहित केल्यानंतर तयार होणारे उत्कृष्ट अभयारण्ये / राष्ट्रीय उद्याने क्षेत्राचा फायदा संपूर्ण समाजाला मिळतो. सबब संपूर्ण समाजाच्या फायद्यासाठी स्वतःच्या फायदयांना तिलाजंली देणारे पुनर्वसित व्यक्तिंच्या उदरनिर्वाह व उपजिविकेसाठी त्याला एक नियमित उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण होईल. पुनर्वसित होणा-या कुटुंबानी जमीन / कृषी भूमी सारखी स्थावर

मालमत्ता अर्जित करावयाची असल्यास त्यासाठी आवश्यक रक्कम धनाकर्ष स्वरुपात ज्याचा उल्लेख विक्री करारनाम्यात असणे आवश्यक आहे अशी रक्कम संयुक्त खात्यातून संबंधित सहाय्यक वन संरक्षक व उपविभागीय महसूल अधिका-यांच्या संयुक्त शिफारशीनंतर देण्यात येईल.

१३ ग्रामसभेने मान्यता दिल्यास:

अ) सर्व कुटुंबांना सम प्रमाणात रु. १०.०० लक्ष रुपये अदा करण्यात येतील.

तथापि

ब) वरील विकल्प मान्य नसेल व ज्यांच्याकडे स्थावर मालमत्ता असून ते त्यासाठी त्याचे मूल्याकंनाची रक्कम मागत असल्यास, अशा मालमत्तेचे जिल्हाधिकारी यांनी महाराष्ट्र प्रकल्पग्रस्त व्यक्तिंचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ चे कलम-११ अंतर्गत प्राप्त सुचनेच्या तारखेला लागू महानोंदणी निरिक्षक यांचे शिघ्र सिध्द गणक दर प्रमाणे मुल्यांकनाएवढी व अतिरिक्त दिलासा (३०%) रक्कम संबधित कुटुंबाला दिल्यानंतर गावांच्या सर्व पात्र कुटुंबांना मिळणा-या एकूण रोख रकमेतून वजा केल्यावर उर्वरीत रक्कम सर्व पात्र कुटुंबामध्ये सम प्रमाणात वितरीत करण्यात यावी. तथापि काही कुटुंबानी व त्यासंबधी ग्रामसभेने मान्यता दिल्यास त्या कुटुंबाला देय होणा-या रु.१०.०० लक्ष पैकी विद्युतीकरण, पाणी पुरवठा, कृषी भूमी, गावठाणातील घराकरिता जागा इ. साठी आवश्यक असणारी रक्कम संबधित यंत्रणा उदा. सार्वजनिक बांधकाम विभाग, महावितरण, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद, सिंचन व पाटबंधारे विभाग इ. कडे वर्ग करता येईल.

१४ पर्याय १ हा गावांच्या रहिवाशांकरिता असून, महाराष्ट्र मदत व पुनर्वसन कायदयाच्या कलम ११ अंतर्गत निर्गमित अधिसुचनेच्या तारखेला वैध असलेला गावातील रहिवाशी असल्याबाबतची पात्रता तपासण्याकरिता खालील तीन पुराव्यांपैकी कोणताही एक पुरावा असणे आवश्यक आहे.

१) ग्रामपंचायतचे ८-अ (घराचा दाखला) दाखल,

२) शिधा पत्रिका,

३) निवडणूक ओळखपत्र

१५ जे कुटुंब गावातील रहिवाशी नसून त्यांचे नावांवर फक्त गावांत जमिन व इतर स्थावर मालमत्ता असेल अशा कुटुंबाना त्यांचे मालमत्तेचे मुल्याकंना एवढी रक्कम भरपाई देण्यात येईल तथापि त्यांना रु.१०.०० लाख रोख रकमेचे पॅकेज लागू राहणार नाही.

पर्याय - १ च्या बाबतीमध्ये पुनर्वसन प्रक्रिया पूर्ण करण्याची जबाबदारी वन्यजीव वृत्तांचे संबधीत मुख्य वनसंरक्षक / अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनी नेमलेले किमान उपवनसंरक्षक दर्जाच्या प्रकल्प अधिका-याची राहील.

**पर्याय २ :-**

१. **अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने तथा अन्य वन प्रकल्पामुळे बाधित होणा-या कुटूंबाना देय पर्यायीजमीन वाटपाबाबत खालील प्रमाणे कार्यपध्दती राबविण्यात यावी.**

१.१ पर्यायी जमिनीचे वाटप करणे :-

**अ) पर्यायी जमिनीचे क्षेत्र :** प्रत्येक प्रकल्पग्रस्त शेतकरी कुटुंबाची जमीन अभयारण्ये /राष्ट्रीय उद्याने किंवा अन्य वन प्रकल्प यासाठी संपादित झालेली आहे त्याकरिता खालील प्रमाणे जमीन उपलब्ध करुन देण्यात येईल.

| पुनर्वसीत क्षेत्रात कुटूंबाची संपादीत जमीनीचे क्षेत्रफळ | उपलब्ध करुन देण्यात येणा-या पर्यायी जमीनीचे क्षेत्रफळ |
|---|---|
| १) ८० आर किंवा त्यापेक्षा कमी | १) किमान ४० आर तथापि ८० आर पेक्षा कमी |
| २) ८० आर पेक्षा जास्त परंतु २ हेक्टर पेक्षा कमी | २) किमान ८० आर तथापि १ हेक्टर २० आर पेक्षा कमी |
| ३) २ हेक्टर पेक्षा जास्त | ३) २ हेक्टर |

**ब) भूमिहीन शेतमजूर कुटूंबास देय जमीन :** अभयारण्य / राष्ट्रीय उद्यानातील विस्थापित होणा-या प्रत्येक भूमिहीन कुटुंबास ४० आर जमीन उपलब्ध करण्यात येईल.

**क) शेती योग्य जमीन :** वाटप करण्यात येणारी जमीन शेती योग्य असावी, आवश्यकता भासल्यास सदर जमिनीचे सपाटीकरण करुन शेती योग्य करण्यात यावी.

**१.२ राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये तथा अन्य वन प्रकल्पास लाभक्षेत्र नसल्यामुळे पर्यायी जमीन उपलब्ध होण्यासाठी खालील प्रमाणे विविध पर्याय क्रमाने विचारात घेण्यात यावेत:-**

१) ज्या ठिकाणी नजिकच्या पाटबंधारे धरणाच्या लाभक्षेत्रात जमीन उपलब्ध आहे त्या लाभ क्षेत्रात या पाटबंधारे बाधित कुटुंबियांचे पुनर्वसन, महाराष्ट्र प्रकल्प ग्रस्त लोकांचे पुनर्वसन अधिनियम १९९९ मधील तरतूदी प्रमाणे करण्यात येत असत. प्रकल्पाच्या प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीन दिल्यानंतर ही जमीन उपलब्ध असल्यास ती जमीन प्राधान्याने वापरावी.

२) पाटबंधारे धरणाच्या लाभक्षेत्रात जमीन उपलब्ध नसल्यास व शासकीय जमीन किंवा गायरान जमीन, ई-क्लास जमीन उपलब्ध असल्यास पर्याय जमीन देण्यासाठी अशी जागा उपलब्ध करुन देण्यासाठी जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. हा पर्याय तपासतांना लगतच्या गावठाणात उपलब्ध जमिनीचाही विचार करण्यात यावा.

३) पर्यायी जमिनीच्या वाटपासाठी खाजगी जमीन आवश्यक कार्यपध्दतीचा अवलंब करुन खरेदी करुन वाटपासाठी उपलब्ध करावी.

४) उपरोक्त सर्व पर्याय हाताळून वाटपांसाठी जमीन उपलब्ध झाली नसल्यास संबधित प्रकल्पग्रस्तांना त्यांना देय असलेल्या जमीनीची, महानोदंणी निरिक्षक यांचेकडील लागू असलेले तारखेपासून शिघ्र सिध्द गनक दर पध्दती प्रमाणे किंमत व त्यावर अतिरिक्त दिलासा रक्कम ३०% सानुग्रह अनुदान रोखीने देण्यात यावी.

५) पूर्ण गावाकरिता स्थावर मालमत्तेचे मूल्यांकन गावांला देय होणा-या एकूण पॅकेजच्या ३०% पेक्षा अधिक असेल तर उर्वरीत रक्कम शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात येईल.

६) प्रत्येक कुटुंबाला पॅकेजच्या २०% रक्कम घराचे जागेसाठी व बांधकामासाठी उपलब्ध करुन देण्यात येईल.

७) जर पुनर्वसीत होणा-या कुटुंबाना कृषी योग्य भूमी शासनाकडून विनामूल्य उपलब्ध करुन देण्यात येत असेल तर, त्याकरिता निर्धारीत रक्कम ( पॅकेजच्या ३५% रक्कम तसेच हक्क संपादित केल्यानंतर उर्वरीत रक्कम ) सार्वजनिक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी वापरता येतील.

८) सार्वजनिक सुविधा देताना पुनर्वसित गावास दिलेल्या शेतजमीनीला सिंचन करण्याकरिता लघु सिंचन योजना उपलब्ध पॅकेज निधी मधुन मंजूर करुन प्राधान्याने शेत जमीन सिंचनाखाली आणण्याचे सर्व प्रयत्न करण्यात येतील.

९) पुनर्वसीत गावांसाठी सामाजिक विकास आराखडा जिल्हाधिकारी याच्यांशी विचारविनिमय करुन व अस्तित्वात असणा-या इतर योजनांचा समावेश करुन तयार करण्यात यावा.

१०)पुनर्वसन विभागाचे संदर्भीय शासन निर्णयाप्रमाणे रु. १.०० कोटी पर्यंत नागरिक सुविधाची प्रशासकीय मान्यता देणेचे अधिकार जिल्हाधिकारी यांना राहतील व रु. १.०० कोटी ते रु. ५.०० कोटी पर्यंतच्या नागरी सुविधा मान्यतेचे अधिकार विभागीय आयुक्तांना राहतील.

११)वरील सर्व पर्याया प्रमाणे वनेत्तर जमीन उपलब्ध नसल्यास व पर्यायी जमीन म्हणून वाटप करण्यासाठी वन जमीन उपलब्ध होणे शक्य असल्यास वनसंवर्धन कायदा १९८० प्रमाणे वन जमीनीच्या वनेत्तर प्रयोजनात वळती करण्यासाठी आवश्यक त्या सर्व परवानग्या घेवून त्या जमिनीचे वाटप करावे. विभागातील वन जमीन उपलब्ध करतांना झुडपी जंगल जमीनीला प्रथम प्राधान्य देण्यात यावे.

उपरोक्त पर्याय क्रमाने हाताळण्यात यावेत. क्रमांक १ ते ३ येथील पर्याय पडताळूनही पर्यायी जमीन उपलब्ध न झाल्यास पर्याय क्र. ११ नुसार कार्यवाही करण्यात यावी. राष्ट्रीय उद्यान व अभयारण्यातील विस्थापितांसाठी त्याच राष्ट्रीय उद्यानाच्या वा अभयारण्याच्या आत सीमेलगत पुनर्वसनासाठी क्षेत्र मुकर्रर करण्यास प्राधान्याने विचार व्हावा.

**१.३ पर्यायी जमिनीचे रोख मूल्य निर्धारीत करणे :**

पर्यायी जमिनीच्या बदल्यात प्रस्तावित रोख मूल्याची रक्कम ही महाराष्ट्र प्रकल्पग्रस्त पुनर्वसन अधिनियम १९९९ च्या कलम ११ अंतर्गत करण्यात आलेल्या अधिसुचनेच्या तारखेला लागू महानोंदणी निरिक्षक यांचे शिघ्र सिध्द गणक दर प्रमाणे मुल्यांकनाएवढी अतिरिक्त दिलासा (३०%) रकमेची परिगणना करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी (महसूल प्रभाग) यांची राहील.

**१.४ पर्यायी जमिनीच्या वाटपासाठी किंवा जमीन खरेदी करुन वाटपासाठी निधी उपलब्ध करणे :**

राष्ट्रीय उद्याने व अभयारण्ये यावरील विस्थापितांच्या पुनर्वसनाचा संपूर्ण खर्च (पर्यायी जमिनीच्या खर्चासह) वन विभागाने करावा व त्याकरिता त्यांच्या अर्थसंकल्पात तरतूद करणे किंवा सबंधित संस्थेकडून उपलब्ध करुन घेणे आवश्यक राहील. याकरिता पुनर्वसन कामासाठी CAMPA च्या वार्षिक नियोजन आराखडयामध्ये किमान १०% रकमेची तरतूद

करण्यात यावी. तसेच पुनर्वसनासाठी आवश्यक असणारी तरतूद **१३ व्या वित्त** आयोगातून व उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतुदीतून करण्यात येईल. तसेच आदिवासी विभागाचे मान्यतेने **आदिवासी उपाययोजने** मधुन सुध्दा पुनर्वसनाची कामे घेता येतील.

१.५ **पूनर्वसन कामाची अंमलबजावणी करण्यासाठी व सदर कामांवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रत्येक जिल्हयात खालीलप्रमाणे जिल्हा स्तरीय समिती स्थापित करण्यात येत आहे.**

| | |
|---|---|
| i) जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| ii) उपवनसंरक्षक (प्रादेशिक) | सदस्य सचिव |
| iii) उपवनसंरक्षक (वन्यजीव) | सदस्य |
| iv) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| v) कार्यकारी अभियंता, सा.बा.विभाग | सदस्य |
| vi) कार्यकारी अभियंता, पाटबधारे विभाग | सदस्य |
| vii) कार्यकारी अभियंता, म.रा.वि.मंडळ | सदस्य |
| viii) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी प्रकल्प. | सदस्य |

समितीला आवश्यक वाटल्यास सभेत इतर संबधित अधिका-यांचे पाचारण करता येईल.

**सदर समितीची बैठक महिन्यातून कमीतकमी एकदा होईल. सदर समितीची जबाबदारी खालील प्रमाणे राहील.**

१) पुनर्वसनासाठी संबधित गावांच्या सहमतीने जमिनीची निवड करणे.
२) पुनर्वसनासाठी आवश्यक वन जमिनीचे वनसंवर्धन अधिनियम १९९९ अंतर्गत केंद्र शासनाची मंजूरी प्राप्त करणे.
३) पुनर्वसित गावठाणात नागरी सोयीसुविधा पुरविणे.
४) शेतीसाठी जमिनीला शेती योग्य करणे.
५) बाधित कुटूबांना शेत जमिनीचे वाटप करणे.
६) सदर कामासाठी लोकसहभाग व स्वयंसेवी संस्थाकडून सहभाग घेणे.
७) पर्याय- १ किंवा पर्याय-२ लागू करणे बाबत निर्णय घेणे.
८) एकूण कुटुंबाची संख्या निर्धारीत करणे.
९) प्रकल्पग्रस्त कुटुबांचे तक्रारीचे निराकरण करणे.
१०) प्रकल्पग्रस्त कुटुंबाचे यादी बाबत तक्रारीचे अंतिम निर्णय घेणे.
११) १८ वर्षावरील सज्ञान मुलगा/मुलगी यांना कुटुंबाचा दर्जा देणे बाबत निर्णय घेणे.
१२) व्यक्ति गावातील रहिवाशी आहे किंवा नाही याचा निर्णय घेणे.

२. **पुनर्वसीत गावांना महाराष्ट्र प्रकल्पग्रस्त लोकांचा पुनर्वसन अधिनियम १९९९ च्या कलम १० मध्ये प्रस्तावित केल्यानुसार खालीलप्रमाणे सार्वजनिक सुविधा पुरविण्यात याव्यात.**

२.१ पिण्याच्या पाण्याची कायम स्वरुपी सोय.
२.२ शाळा व त्यासोबत खेळाचे मैदान.

२.३ ग्रामपंचायत कार्यालय, चावडी किंवा समाज मंदिर बांधणे.
२.४ अंतर्गत खडी रस्ते.
२.५ आवश्यक झाल्यास शेत जमिनीतून पायवाट.
२.६ वीज पुरवठा.
२.७ स्मशानभूमि.
२.८ गटारे.
२.९ सार्वजनिक किंवा वैयक्तिक शौचालयांसाठी अर्थ सहाय्य.
२.१० जनावरे ठेवण्यासाठी जमीन.
२.११ बस स्टॅन्डसाठी जमीन.
२.१२ खळवाडीसाठी जमीन.
२.१३ चराईसाठी जमीन.
२.१४ बाजारासाठी विकसित जमीन.
२.१५ भविष्यात गावठाणाच्या विस्तारासाठी जमीन.
२.१६ माध्यमिक शाळा, दवाखाने, प्राथमिक आरोग्य केंद्र, बँक, पोस्ट ऑफिस, मुलांसाठी उद्याने, इत्यादी जमीन.
२.१७ या गावठाणातील लोकांसाठी नोंदणीकृत संस्थेसाठी जमीन.
२.१८ खेळाच्या मैदानासाठी जमीन.
२.१९ या व्यतिरिक्त पुनर्वसनाशी संबधीत इतर पुरक व अनुषंगीक कामे या पर्यायाअंतर्गत करता येतील.

पूनर्वसन प्रक्रिया पूर्ण करण्याची जबाबदारी संबधित जिल्हाधिकारी आणि जिल्हा पूनर्वसन समिती यांचेवर राहील. पुनर्वसन प्रक्रियेची अंमलबजावणी करण्याकरिता यंत्रणा निश्चित करण्याची जबाबदारी संबधित जिल्हाधिकारी यांची राहील. संबधित विभागीय आयुक्त सदर पुनर्वसन प्रक्रियेवर संनियंत्रण ठेवतील.

ज्याचे कार्यक्षेत्रात पुनर्वसन होणार आहे त्या क्षेत्राचे संबधित उपवनसंरक्षक (प्रादेशिक) हे पुनर्वसनाकरिता पदसिध्द प्रकल्प अधिकारी राहतील व पुनर्वसनाची जबाबदारी त्यांची व जिल्हाधिकारी यांची संयुक्तपणे असेल. विभागीय आयुक्त संपूर्ण पुनर्वसन प्रक्रियेवर सनियंत्रण ठेवतील.

**चालू असलेल्या पुनर्वसन प्रक्रियेला (उदा. कोयना अभयारण्य, टिपेश्वर अभयारण्य, नवेगांव राष्ट्रीय उद्यान, ताडोबा अधांरी व्याघ्र प्रकल्प) हा शासन निर्णय लागू राहील. त्याच प्रमाणे इतर संरक्षित क्षेत्रातील चालू असलेल्या पुनर्वसन कामांना देखील सदर शासन निर्णयातील तरतूदी लागू राहतील.**

**पुनर्वसनासाठी प्राप्त होणा-या निधीकरिता स्वीयप्रपंची लेखा किंवा वन विकास यंत्रणेत जमा करणेः**

पुनर्वसन ही एक दीर्घ कालावधी पर्यत चालणारी प्रक्रिया असून, त्याकरिता लागणा-या निधीची सातत्याने आवश्यकता असते. प्रकल्पग्रस्ताच्या हिताला केंद्रस्थानी ठेवता व प्रशासकीय निकड लक्षात घेता राज्य शासनाने या संबधामध्ये यापूर्वीच महसूल व वन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक -आरपीए-२००६/प्र.क्र.१(२) र-१ दिनांक १७.३.२००६ च्या शासन निर्णयामध्ये पुनर्वसन कामासाठी

आवश्यक निधीसाठी स्वीयप्रंपची लेखा उघडण्याबाबत धोरणाला संमती दिली असल्यामुळे वन्य प्राणी अभयारण्य / राष्ट्रीय उद्यान / व्याघ्र प्रकल्पातून पुनर्वसीत होणा-या कुटुंबासाठी प्राप्त निधी करिता पुनर्वसन प्रशासकाकडे स्वीयप्रंपची लेखा उघडता येईल किंवा संयुक्त वन व्यवस्थापन अन्वये स्थानिक जनतेचे वन विषयक बाबीमध्ये सहभाग वाढविण्यासाठी स्थापित वन विकास यंत्रणेचे उद्देश विचारात घेता सदर निधी संबधित वन विकास यंत्रणेच्या खात्यात जमा करता येईल. पर्याय-१ च्या बाबतीत उपजीविकेचे व उदरनिर्वाहाचे साधनांच्या विकासाकरिता निधी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडे जमा करता येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(विवेक खांडेकर)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग.

प्रति,

मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई-३२
प्रधान सचिव (पुनर्वसन), महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई-३२
प्रधान सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई-३२
प्रधान सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय मुंबई-३२
प्रधान सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय मुंबई-३२
प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय मुंबई-३२
प्रधान सचिव, पाटबंधारे विभाग, मंत्रालय मुंबई-३२
प्रधान सचिव, उर्जा विभाग, मंत्रालय मुंबई-३२
प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय मुंबई-३२
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख ) महाराष्ट्र राज्य, नागपूर.
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य, नागपूर.
विभागीय आयुक्त (सर्व ), जिल्हाधिकारी (सर्व )
जिल्हा पुनर्वसन अधिकारी (सर्व), उपविभागीय अधिकारी (सर्व)
महालेखापाल १ व २ (लेखापरिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), म.रा. मुंबई / नागपूर.
वित्त विभाग, (व्यय-१०), मंत्रालय, मुंबई-३२
कार्यासन फ-२ ते फ-११, महसुल व वन विभाग, मंत्रालय मुंबई -३२
फ-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई -३२ (निवडनस्ती)

---